प्रेसनोट

पोलीस उप आयुक्त, वाहतुक यांचेकार्यालय,
बंगला नं ६ येरवडा पोस्ट ऑफीस जवळ,
पुणे-४११००६

जा.क्र./पोउआ/वाह/ 2075/२०२४

पुणे दिनांक - 20/03/२०२४

पुणे शहरातील विश्रामबाग वाहतुक विभागांतर्गत वाहतुक सुरक्षित व सुरळीतपणे होणेकरीता, महाराष्ट्र शासन गृह विभाग क्र. एम. व्ही. ए. ०१९६/८७१/सीआर - ३७/टीआरए - २, दिनांक - २७/०९/१९९६ चे नोटीफिकेशननुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६(१) (ए) (बी), ११६(४) आणि ११७ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करुन मी रोहिदास पवार, पोलीस उप-आयुक्त, वाहतुक, पुणे शहर, विश्रामबाग वाहतुक विभागातील खालील नमुद रस्त्यांवर तात्पुरत्या स्वरुपात खालील प्रमाणे आदेश निर्गमित करीत आहे. यापुर्वी या ठिकाणी काही पार्किगचे निर्बंध असतील ते रद्द करण्यात येत आहेत.

**विश्रामबाग वाहतुक विभाग पुणे अंतर्गत,**

- **टिळक स्मारक मंदिर गेटचे भिंतीलगत २० मीटर नो पार्किंग करण्यात येत आहे.**
- **नारळीकर इन्स्टीटयुट कडून टिळक स्मारक मंदिर कडे येताना (कुमार स्टेशनरी व झेरॉक्स दुकान)रस्त्याचे उजव्या बाजूस ५० मीटर नो पार्किंग करण्यात येत आहे.**

तरी नागरीकांनी याबाबत आपल्या काही सुचना असल्यास त्या पोलीस उप-आयुक्त, वाहतूक नियंत्रण शाखा, येरवडा पोस्ट ऑफीस, बंगला नं-६ जेल रोड पुणे ४११००६ यांचे कार्यालयात दिनांक – 29/03/२०२४ ते दिनांक – ४/४ /२०२४ पर्यंत लेखी स्वरूपात कळवाव्यात. नागरीकांच्या सूचना व हरकती विचार करुन व अत्यावश्यक सेवेतील वाहने (उदा. फायरब्रिगेड, पोलीस वाहने, रुग्णवाहीका, इ.) खेरीज करून अंतिम आदेश काढण्यात येतील.

(रोहिदास पवार)
पोलीस उप-आयुक्त ,वाहतूक
पुणे शहर

प्रति,

**जिल्हा माहिती व प्रसिध्दी अधिकारी,** नविन मध्यवर्ती इमारत, पुणे - ०१
२/- सदरची प्रेसनोट सर्व वर्तमानपत्रातुन प्रसिध्द करण्याची विनंती आहे.

प्रत :-

१) **सहा. पोलीस आयुक्त, वाहतूक – २,** पुणे शहर.
२) **पोलीस निरिक्षक, प्रेसरूम,** पोलीस आयुक्त कार्यालय, पुणे शहर
२/-सदर प्रेसनोटच्या प्रती पत्रकारांना देवून, सदरची बातमी वर्तमानपत्रातून प्रसिध्द करण्याची विनंती करावी.
३) **प्रभारी अधिकारी येरवडा** वाहतुक विभाग, पुणे शहर.
२/- सदर प्रेसनोटच्या प्रती संबंधित दुकानदार / प्रतिष्ठीत व स्थानिक नागरिक यांना तात्काळ अदा करून, त्यांची स्वाक्षरी घेवून ती प्रत इकडील कार्यालयात रिपोर्टाराह दोन दिवसात सादर करावी.
४) **पोलीस उप निरीक्षक, मल्टीमिडीया कक्ष, वाहतूक शाखा, पुणे शहर**
२/- सदर प्रेसनोट ही पुणे वाहतुक पोलीस वेबसाईट व फेसबुकवर / ट्विटरवर अपलोड करावी. सदरची प्रेसनोट कोणत्या वर्तमानपत्रात प्रसिध्द झाली आहे, त्या वर्तमानपत्राचे कात्रणाची छायांकित प्रत इकडील कार्यालयात सादर करावी.
५) पोलीस निरीक्षक, नियोजन, वाहतूक शाखा, पुणे शहर
२/- संबंधित विभागांचे प्रभारी अधिकारी यांचेकडून पूर्तता अहवाल प्राप्त करुन घेऊन सादर करावा.

Scanned with OKEN Scanner